(1)

2033

जा.क्र. माध्य-3/93/जा.मु./मान्यता/पुवि/९९

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 9 FEB 1999

प्रति,

मुख्याध्यापक,

न्यू इंग्लिश स्कूल भावडी.
ता. आंबेगाव, जि. पुणे

विषय :- अशासकिय अनुदानित माध्यमिक शाळेतील
वाढा मंजूर केलेल्या तुकड्यांबाबत...
सन १९९८-९९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, सन ९८-९९ या शैक्षणिक वर्षात आपल्या शाळेची पट पडताळणी केली असता इयत्ता ---८वी--- या वर्गाच्या ---२री--- वाढा तुकडीस मंजुरी देण्यात येत आहे. तसे आदेश शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद ---पुणे--- यांना अलाहिदा देण्यात आलेले आहेत. तरी आपण शिक्षण अधिकारी यांच्याशी हे पत्र मिळाले पासून चार दिवसांच्या आत संपर्क साधावा. व आपल्या शाळेचा शिक्षक/शिक्षकेतर संच सुधारित रित्या मंजूर करून घ्यावा. या तुकड्यावर नविन शिक्षक नेमण्यात येवू नयेत. खात्याकडून अतिरिक्त शिक्षक पाठविण्यात येईल. सदर शिक्षकास हजर करून घेणे बंधनकारक आहे. नविन शिक्षक नेमण्यापूर्वी शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद ---पुणे--- यांची मान्यता घेऊनच नेमणूक करावी. याबाबत आपल्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेशी संपर्क साधून सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे